


दैनिक **अक्षराज**

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा... आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...

कृपया इथे स्कॅन करा — Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १५३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.१५ जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# ठाकरे बंधू की महायुती? मुंबईच्या महासंग्रामाचा 'काऊंटडाऊन' सुरू

## मतदानासाठी महापालिकेची यंत्रणा सज्ज !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१४, मुंबई :** देशाचे लक्ष लागून राहिलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या २२७ प्रभागांसाठी उद्या, १५ जानेवारी रोजी मतदान पार पडणार आहे. तब्बल नऊ वर्षांनंतर होत असलेल्या या निवडणुकीसाठी महापालिका आणि पोलीस प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले असून, गुरुवारी सकाळी ७ वाजेपासून मतदानाला सुरुवात होईल. शिवसेनेतील फुटीनंतरची ही पहिलीच निवडणूक असल्याने ही लढत केवळ श्रीमंत पालिकेच्या सत्तेसाठी नसून अस्तित्वाची आणि प्रतिष्ठेची ठरणार आहे.




**प्रशासकीय यंत्रणा ऑन ड्युटी; ६४ हजार कर्मचाऱ्यांची नियुक्ती**

निवडणूक प्रक्रियेसाठी मुंबईत एकूण १० हजार २३१ मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. या प्रक्रियेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रशासनाने ६४ हजार ३७५ अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. आज २३ विभागीय केंद्रांवरून मतदान साहित्य वाटपाची प्रक्रिया पार पडली. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अश्विनी जोशी यांनी अंधेरी येथील क्रीडा संकुलात जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. मतपेट्या, शाई, सील आणि मतदार यादीसह सर्व पथके आपल्या नियोजित केंद्रांकडे रवाना झाली आहेत.

**ठाकरे बंधू विरुद्ध महायुती: अस्तित्वाची लढाई**

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका होत असल्या तरी सर्वांचे लक्ष मुंबई कोणाची? याकडे लागले आहे. भाजप आणि शिवसेना (शिंदे) यांची महायुती विरुद्ध उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या पक्षांमधील ही लढत ऐतिहासिक ठरणार आहे. १७०० उमेदवार मैदानात असून, त्यात शिवसेना (ठाकरे), शिवसेना (शिंदे), भाजप, काँग्रेस, मनसे राष्ट्रवादी काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी या प्रमुख पक्षांसह तब्बल २९ पक्षांचे उमेदवार नशीब आजमावत आहेत.

**आज मतदान, उद्या निकाल!**

यंदा राज्य निवडणूक आयोगाने मतदानानंतर लगेच दुसऱ्या दिवशी म्हणजेच १६ जानेवारी रोजी मतमोजणी जाहीर केली आहे. त्यामुळे निकालासाठी मुंबईकरांना फार वाट पाहावी लागणार नाही. मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी सर्व पात्र मतदारांना निर्भयपणे घराबाहेर पडून आपला मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन केले आहे.

**चोख पोलीस बंदोबस्त !**

मतदानाच्या दिवशी कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी मुंबई पोलिसांनी शहरात कडेकोट बंदोबस्त तैनात केला आहे. संवेदनशील केंद्रांवर अतिरिक्त कुमक लावण्यात आली असून भरारी पथकेही सक्रीय आहेत.

# देवगाव हादरले! ६३ दिवसांत सहावा बिबट्या जेरबंद

## संतप्त ग्रामस्थांनी रोखले वनविभागाचे वाहन...

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१४, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यातील पूर्व भागात असलेल्या देवगाव परिसरात बिबट्यांच्या दहशतीने कळस गाठला आहे. अवघ्या ६३ दिवसांत आणि अवघ्या दोन किलोमीटरच्या परिघात आज सहावा बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद झाला. मात्र, बिबट्या जेरबंद होऊनही ग्रामस्थांचा रोष कमी झाला नाही. सततच्या हल्ल्यांना कंटाळलेल्या संतप्त ग्रामस्थांनी हा परिसर 'बिबट आपत्ती प्रवण क्षेत्र' घोषित करण्याच्या मागणीसाठी वनविभागाची गाडी तब्बल चार तास रोखून धरली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, देवगाव परिसरातील वाकद, शिरवाडे, कानळद, रुई, मानोरी, महादेवनगर, धानोरे आणि कोळगाव या गावांमध्ये बिबट्यांचा मुक्त वावर असून, आजवर नऊ नागरिक बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झाले आहेत. बुधवारी (दि. १४) पहाटे देवगाव येथील किशोर दत्तु बोचरे यांच्या गट नंबर ८०/२ मध्ये वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात अंदाजे सहा वर्षे वयाचा पूर्ण वाढ झालेला नर बिबट्या अडकला.



बिबट्या जेरबंद झाल्याची बातमी समजताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र, वारंवार होणाऱ्या हल्ल्यांमुळे आणि सतत सापडणाऱ्या बिबट्यांमुळे ग्रामस्थांचा संयम सुटला. आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत ही अतिसंवेदनशील गावे 'संभाव्य बिबट आपत्ती प्रवण क्षेत्र' म्हणून घोषित करा, या मागणीसाठी ग्रामस्थांनी बिबट्याला घेऊन जाणाऱ्या वनविभागाच्या वाहनाला घेराव घालत चार तास रोखून धरले.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून येवला प्रादेशिक वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल घुगे यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी ग्रामस्थांच्या मागणीची दखल घेत, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडे याबाबतचा प्रस्ताव तात्काळ पाठविण्याचे लेखी आश्वासन दिले. यानंतर ग्रामस्थांनी माघार घेतली आणि सदर बिबट्याला म्हसरूळ येथील वन्यजीव संरक्षण केंद्रात हलविण्यात आले.

या कारवाईत विंचूरचे वनरक्षक विजय दोंदे, गोपाल राठोड, पंकज नागपुरे तसेच निफाडचे रेस्क्यू टीम सदस्य भारत माळी, सागर दुसिंग, विजय माळी, राहुल ताटे, असिफ पटेल, सुनील भुरुक यांनी सहभाग घेतला. यावेळी उपसरपंच लहानु मेमाणे, मनोहर बोचरे, किशोर बोचरे, भागवत बोचरे, धनजंय जोशी, राजेंद्र मेमाणे, पोलीस पाटील सुनील बोचरे, संदिप बोचरे, नागेश्वर बोचरे, गोपीनाथ मेमाणे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

**देवगावात आतापर्यंत जेरबंद झालेले बिबटे (मागील दोन महिने)**

**या भागात बिबट्यांचा वावर किती वाढला आहे, हे खालील आकडेवारीवरून स्पष्ट होते:**

१) १२ नोव्हेंबर २०२५: शरद जोशी (गट क्र. ४८५)
२) १७ नोव्हेंबर २०२५: चांगदेव शिंदे (गट क्र. १९१)
३) ०४ डिसेंबर २०२५: सुनील बोचरे (गट क्र. ४१४/१)
४) २१ डिसेंबर २०२५: लक्ष्मीकांत सुखदेव रोटे (गट क्र. ६०३)
५) ०८ जानेवारी २०२६: परशराम कचेश्वर बोचरे (गट क्र. ९६/१)
६) १४ जानेवारी २०२६: किशोर दत्तु बोचरे (गट क्र. ८०/२)

# संक्रातीवर महागाईचे सावट; तीळगुळाचा गोडवा झाला कडू!

**अक्षराज : विश्वास वराळे**



**दि.१४, धाराशिव :** आपल्या हातून कळत-नकळत झालेल्या पापापासून मुक्ती व्हावी. महिलांचे सौभाग्य अखंड राहावे, याकरिता मकरसंक्रांतीचा सण साजरा केला जातो. या सणात तीळगूळाला विशेष महत्त्व आहे. हल्ली तिळाचा व त्यासोबतच आवश्यक असलेल्या गुळाचा भाव वाढल्याने 'तीळगूळ घ्या आणि गोड गोड बोला' असे म्हणताना जीभ अडखळू लागली; नव्हे त र तीळगुळाचा गोडवाच कडू झाला आहे.

वाढत्या महागाईचे चटके श्रीमंतांना व गरीब वर्गाला नव्हे, तर मध्यम वर्गीयालाच सर्वाधिक बसतात. हल्ली सर्वच सण-समारंभांचे महत्त्व वाढत्या महागाईने कमी होत चालले आहे. त्यातील आनंद व उत्साह कमी झाला. पौष महिन्याच्या सुरुवातीला तीळसंक्रांत (मकरसंक्रांत) हा सण येतो. या सणाचे हिंदू धर्मात मोठे महत्त्व आहे. या सणामध्ये तिळाच्या वस्तूंना अधिक प्राधान्य देण्यात आले आहे. हिंदू शास्त्राप्रमाणे तीळमिश्रित पाण्याने स्नान करणे, स्नान करण्यापूर्वी तीळ बारीक करून तयार केलेले उटणे अंगास लावणे, होमात तीळ टाकणे, तिळाचे तेल अंगास लावणे, तीळ भक्षण करणे (खाणे), तिळाचे दान करणे अशा सहाप्रकारे तिळाचा उपयोग मनुष्याने केल्यास तो सर्व पापातून मुक्त होतो.

पूर्वी या तीळसंक्रांतीला घरी येणाऱ्या पाहुण्यांना वाटीत तीळगूळ अथवा तिळापासून तयार झालेले पदार्थ दिले जात होते. वाढत्या महागाईमुळे ते शक्य नाही. आज बाजारपेठेत तिळाचा भाव गगनाला भिडला. चांगल्या प्रतीचे तीळ २०० रुपये किलो, मध्यम १६० रुपये तर काळपट झालेले तीळ १४० ते १७० रुपये किलोच्या भावात विकले जात आहे. तीळगूळ तयार करण्यासाठी तिळासोबत गुळाची गरज भासते. गोडवा येण्याकरिता वापरला जाणारा गूळ ८० रुपये किलोपासून १२० रुपये किलोपर्यंत बाजारपेठेत खडेदार तर ९० रुपये किलोचा गूळ विक्रीकरिता आहे. कमी प्रतीचा गूळ आंबट व चवदार असल्याचे सांगण्यात येते. ज्या महिलांना घरी तीळगूळ करणे शक्य नाही. त्यांच्याकरिता बाजारपेठेत २७५ रुपये किलोच्या भावात तीळगूळ उपलब्ध आहे. तिळाची वडी व लाडू ४०० रुपये किलो आहेत. महिलांना वाणात वितरित करण्यासाठी लागणाऱ्या वस्तूंचेही भाव कडाडले आहेत. वाणामध्ये टाकले जाणारे बोर ३० ते ४० रुपये पायली (किलो), ऊस १ नग ३५ रुपयाला तर स्टील किंवा प्लास्टिकच्या वस्तू १०० रुपये डझनाच्या खाली नाहीत. महागाईचा भस्मासुर सण-समारंभाचा उत्साह कमी करीत असताना महागाईने तिळाचा गोडवा कमी केल्याचे दिसत आहे.

**अखंड सौभाग्यासाठी तिळाचे महत्त्व...**

पापाचा नाश होतो म्हणून मकरसंक्रांतीला तिळाचे महत्त्व आहे. यानिमित्त महिलावर्ग वाणाचे वितरण करतात. ही प्रथा अखंड सौभाग्य लाभावे, याकरिता आहे. पापाचा नाश करण्यासाठी तीळ पदार्थाचे वितरण व्हावे म्हणून हळदीकुंकवासाठी महिलांना घरी बोलाविले जाते. हळदीकुंकू लावून गहू, बोर, वालाच्या शेंगा, उसाचे तुकडे आदींनी ओटी भरण्यात येते. तत्पूर्वी महिलांच्या हातावर तीळगूळ देण्याची प्रथा आहे.

**- सौ.योगेश्वरी कुलकर्णी, कळंब जि. धाराशिव**

# 'कृषीनाथ'च्या रासायनिक पाण्यामुळे शेतकऱ्यांची शेती धोक्यात !

**निर्णायक स्वरूपाचा लढा सुरु करणार...**

कृषीनाथ ग्रीन एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड साखर कारखान्यातील या रासायनिक सांडपाण्याबद्दल या भागातील नागरिक व अन्याय निवारण समितीचे जिल्हाध्यक्ष अरुणा रोडे यांनी आजपर्यंत प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे शेकडो तक्रारी केल्या आहेत. पण कारखाना प्रशासन आणि प्रदुषण नियंत्रणची हातमिळवणी असल्यामुळे या बाबतीत कोणतीही ठोस कारवाई होत नाही,असा या भागातील नागरिक आणि शेतकऱ्यांचा आक्षेप आहे. कारखान्याच्या रासायनिक पाण्याबद्दल कोणतीही ठोस कारवाई होत नसल्यामुळे कारखाना रात्रंदिवस बिनधास्तपणे आपले प्रदूषित पाणी ओढ्यात व वनखात्याच्या जमिनीत सोडत आहे. असेच सुरू राहिले, तर या भागातील शेकडो एकर शेती नापीक बनण्याचा धोका आहे. त्यामुळे कारखाना आणि प्रदुषण नियंत्रण मंडळ या दोन्ही यंत्रणांना योग्य धडा शिकविण्यासाठी अन्याय निवारण निर्मुलन सेवा समिती येत्या २६ जानेवारी पासून नाशिक येथील प्रदुषण विभागाच्या कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाचा निर्णायक स्वरूपाचा लढा सुरू करणार येणार आहे. असा.इशारा समितीचे अध्यक्ष अरुण रोडे यांनी त्यांच्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिलेला आहे.

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, अहिल्यानगर :** पारनेर तालुक्यातील माळकूप (ढवळपुरी फाटा) येथील कृषीनाथ ग्रीन एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड साखर कारखान्यातील आणि डिस्लरी प्लांट प्रकल्पातील रसायनमिश्रित सांडपाण्यामुळे या परिसराच्या भागातील शेतकऱ्यांच्या जमिनी नापीक होऊन शेतीला धोका निर्माण झाला असून रोगराई वाढण्याचाही धोका वाढला आहे. त्यामुळे या भागातील शेतकरी व अन्याय निवारण समिती कारखान्याच्या आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या विरोधात आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत.

कृषीनाथ ग्रीन एनर्जी साखर कारखाना आणि कारखान्याच्या डिस्लरी प्लांटमधून दररोज हजारो लिटर रसायनमिश्रित व मळीचे शासन नियमानुसार विल्हेवाट न लावता मळी भनगडेवाडी, ढवळपुरी परिसरात आणून टाकली जात असल्याने परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी नापीक होत आहेत. कारखान्याच्या पश्चिम बाजूकडील वाहत्या ओढ्यात वनविभागाच्या हद्दीतील सोडले जाते. पूर्वी या भागातील नागरिक आणि शेतकरी कपडे धुण्यासह जनावरांना पाजण्यासाठी या ओढ्याचे पाणी वापरत होते. मात्र, कृषीनाथ ग्रीन एनर्जी साखर कारखान्याने या ओढ्यात आपले रसायनमिश्रित पाणी सोडायला चालू केल्यापासून या ओढ्याचे संपूर्ण पात्र प्रदूषित झाले आहे. त्यामुळे कोणत्याही कारणासाठी नागरिकांना आता या ओढ्याच्या पाण्याचा वापर करता येत नाही.



कारखान्यातून ज्यावेळी मोठ्या प्रमाणात हे प्रदूषित पाणी ओढ्यात व वनखात्याच्या जमिनीत सोडले जाते, त्यावेळी हे पाणी आजूबाजूच्या शेतात पसरून शेती नापीक होत चालली आहे. अशा या भागातील शेतकर्यांच्या तक्रारी आहेत. पावसाळ्यात हा ओढा दुथडी भरून वाहत असतो. तशातच कारखान्यातील प्रदूषित पाणी मोठ्या प्रमाणात ओढ्यात सोडले जाते. परिणामी, हे प्रदूषित पाणी अगदी हमखास आजूबाजूच्या शेत-शिवारात पसरून शेती नापीक होण्याचा धोका दिवसेंदिवस वाढत चालला आहे.

हे असेच सुरू राहिल्यास कारखान्याच्या रसायनमिश्रित सांडपाण्यामुळे या ओढ्याच्या दोन्ही तीरांवरील शेती कायमस्वरूपी नापीक होण्याचा धोका शेतकर्यांमधून वर्तविण्यात येत आहे.

# घरातच आठ वर्षांच्या लेकीला संपवलं !

**दि.१४, नागपूर :** नागपूरच्या वाठोडा परिसरातून एक हृदयद्रावक आणि समाजाला हादरवून टाकणारी घटना समोर आली आहे. पत्नीशी सुरू असलेल्या कौटुंबिक वादातून एका पित्याने आपल्या आठ वर्षांच्या चिमुकल्या मुलीची चाकूने निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना बुधवारी (१४ जानेवारी) पहाटे घडली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात संताप आणि हळहळ व्यक्त होत असून, वाठोडा पोलिसांनी आरोपी पित्याला अटक केली आहे.

ही घटना वाठोडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सरोदेनगर परिसरातील प्लॉट क्रमांक १२ येथे बुधवारी पहाटे साडेपाचच्या सुमारास घडली. शेखर शेंदरे (वय ४६) असे आरोपी पित्याचे नाव असून, धनश्री शेंदरे (वय ८) असे मृत चिमुकलीचे नाव आहे.

# इंडियन आर्मी डे !



१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश स्वातंत्र्य झाला. देश स्वातंत्र्य करण्यासाठी लाखो ज्ञात - अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. हजारो, लाखो स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानानंतर मिळालेले हे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याची जबाबदारी भारतीय लष्कराची आहे. भारतीय लष्कराने आपली जबाबदारी इमाने इतबारे पार पाडत देशातील परकीय आक्रमणे रोखून धरली. केवळ रोखून धरलीच नाही तर भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणाऱ्या शत्रू राष्ट्रांना दाती तृण धरायला लावले.

भारतीय लष्कराविषयी देशातील १४४ कोटी जनतेला नितांत आदर आहे. भारतीय लष्कराचे भूदल, नौदल व वायुदल हे तीन प्रमुख विभाग आहेत. भूदल अर्थात भारतीय आर्मीचे जवान देशाच्या सीमांचे रक्षण करतात.

आज १५ जानेवारी, आजचा दिवस संपूर्ण देशात भारतीय लष्कर दिन अर्थात इंडियन आर्मी डे म्हणून साजरा केला जातो. चला तर मग आजच्या भारतीय लष्कर दिनानिमित्त आपण या लेखातून भारतीय लष्कराची माहिती घेऊ या. भारतीय लष्कराचा मूळ पाया व अंतर्गत गाभा हा ब्रिटिश आर्मीवर आधारलेला आहे. याच ब्रिटिशांकडून १५ जानेवारी १९४९ ला तत्कालीन फील्ड मार्शल के एम करिअप्पा यांनी पदभार स्वीकारला त्यामुळे हा दिवस भारतीय लष्कर दरवर्षी आर्मी डे म्हणून साजरा करते. भारतीय लष्कर ही प्रशंसनीय काम केलेली सन्माननीय संस्था आहे व आंतरराष्ट्रीय पातळीवरही आपल्या लष्कराला मान आहे. भारतीय लष्कराची एक प्रतिमा आहे, ती चांगली आहे. भारतीय लष्कराची नेहमीच प्रशंसा झालेली असून लष्कराने देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय आव्हानांचा सामना करताना आदर्श कामगिरी केली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांती रक्षक सेनेत भारतीय लष्कराची मोठी भुमिका आहे. आंतरराष्ट्रीय समुदायाने भारतीय लष्कराच्या कामाची नेहमीच स्तुती केली आहे.

भारतीय लष्कर हे केवळ शक्तिप्रदर्शनासाठी नाही. या संस्थेकडे एक परिपक्वता आणि जबाबदारीही आहे. भारतीय लष्कर हे आज जगातील सर्वात शक्तिशाली लष्कर म्हणून ओळखले जाते. केवळ शत्रू राष्ट्रच नव्हे तर अमेरिका, रशिया, चीन यासारखी बलाढ्य राष्ट्रही भारतीय लष्कराची क्षमता जाणून आहे. देशातील १४४ कोटी जनतेचे रक्षण करण्यास भारतीय लष्कर सक्षम आहे. भारतीय लष्कराच्या सर्व जवानांना लष्कर दिनाच्या अर्थात इंडियन आर्मी डे च्या हार्दिक शुभेच्छा! तसेच देशासाठी शहीद झालेल्या भारतीय लष्कराच्या जवानांना विनम्र अभिवादन!!

**जय हिंद!!!**

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# अनुभवी 'तरुणांचे' नंदनवन



देशातील सर्वाधिक निवृत्तिवेतनधारक व्यक्तींच्या शहरांची यादी भविष्यनिर्वाह निधी कार्यालयाने नुकतीच प्रसिद्ध केली. अशी यादी जाहीर होणे ही विशेष बाब नसली, तरी त्यातील शहरांचा क्रम पाहून कोणालाही आश्चर्य वाटावे. 'पेन्शनर्स पॅराडाइज' (सेवानिवृत्तांचे नंदनवन) म्हटले जाणारे पुणे चक्क मागे पडले आहे आणि पहिले-दुसरे स्थान अनुक्रमे कोल्हापूर व नाशिकने पटकावले आहे. महत्त्वाचे म्हणजे, या दोन्ही शहरांतील पेन्शनरच्या आकडेवारीत जेमतेम दोन हजारांचा फरक दिसतो. चौथा क्रमांक नागपूरने पटकावला.

तंत्र-मंत्र आणि यंत्रभूमी नाशिकमध्ये जवळपास दोन लाख सरकारी निवृत्तिवेतनधारक आहेत. काही दिवसांपूर्वी झालेल्या एका खासगी सर्वेक्षणातही नाशिक परिसरात वृद्धांची संख्या झपाट्याने वाढल्याचे आढळले. मुबलक हवापाण्याची ख्याती सर्वदूर पोचल्याने आयुष्याची सायंकाळ आल्हाददायी वातावरणात घालवता यावी यासाठी अनेक जण महानगरांच्या तुलनेत नाशिक-कोल्हापूरसारख्या 'स्वस्त' आणि 'मस्त' शहरांना पसंती देत असावेत. नाशिकमधील चलार्थपत्र मुद्रणालय, एचएएल कारखाना, देवळाली कॅन्टोन्मेंट बोर्ड आदी सरकारी आस्थापना आहेत. तेथील बहुतांश कर्मचारी निवृत्तीनंतर या शहराचीच निवड करतात. परगावाहून येणारा प्रत्येक अधिकारी-कर्मचारी येथे हमखास 'घर' करतो, असे उपरोधाने म्हटले जाते; परंतु त्यात बऱ्याच अंशी तथ्य दिसते. संपर्कसाधने बरी असल्याने मुंबई-पुण्याशी सहज 'कनेक्ट' होता येते. नातेवाईक, मित्रपरिवाराच्या भेटीगाठी शक्य होतात. महानगरांच्या तुलनेत दैनंदिन गरजा कमी पैशांत भागतात. 'पेन्शन'मध्ये धकून जाते.

नाशिकची 'सिस्टर सिटी' म्हटल्या जाणाऱ्या कोल्हापूरलाही हा ठोकताळा लागू पडावा. तथापि, या आकडेवारीतून काही नवे प्रश्नही निर्माण होतात. खरोखरच वृद्धांची संख्या वाढली असेल तर 'वयोवृद्धांचे शहर' ही नवी ओळख शहराला रुचेल काय? खासकरून रोजगाराला आसुसलेल्या युवाशक्तीचा हिरमोड तर होणार नाही ना? गावखेडी शांत, संथ असतात. तुलनेत शहरे धावती असतात. ते विकासाचे वाहक असल्याने तरुणाई हीच गती पकडण्याचा प्रयत्न करते. म्हणूनच शहरांकडे स्थलांतर घडते. शहरातील वृद्ध वाढले असतील, तर ते शहरही 'म्हातारे' म्हणून हिणवले जाऊ शकते. ते धावूच शकणार नाही, असाही अर्थ काढता येतो. मग कशाला हवेत आणखी प्रकल्प आणि विकास, असा सवालही केला जाऊ शकतो. छोट्या शहरांबाबत याची प्रचिती अधून-मधून येत असते. शहराचा विकास कधी होणार, रोजगार कधी वाढणार अशी विचारणा करणारे असतात; तसे गावपण टिकवून ठेवण्याचा आग्रह धरणारेही असतातच!

अलीकडे नाशिक परिसरात बरेच वृद्धाश्रम उघडले आहेत. शहराच्या हद्दीबाहेर त्यांची संख्या झपाट्याने वाढते आहे. त्याची कारणे वर दिलीच आहेत. उच्चभ्रू वसाहतींत दरघरटी मुले परदेशात जात असल्याने एकाकी आयुष्य जगणाऱ्यांची दिवसेंदिवस भर पडते आहे. भारतात सुमारे पंधरा कोटी ज्येष्ठ नागरिक राहतात. हा आज तरुणांचा देश असला, तरी २०५० पर्यंत तो म्हाताऱ्या लोकांचा देश होऊ शकतो. तेव्हा वयोवृद्धांची संख्या ३५ ते ४० कोटी असेल, असे सांगितले जाते. इतक्या संख्येने ज्येष्ठ असतील तर त्यांच्यासाठीच्या सुविधा, त्यांचा 'हॅपीनेस इंडेक्स' आदींचीही काळजी वाहायला हवी ना! दुर्दैवाने अद्यापही आपली व्यवस्था गंभीर नाहीच.

नाशिकमध्ये हवापाणी मुबलक असले, तरी विरंगुळ्याची बोंबाबोंब आहे. सरकारी आस्थापनांत लिफ्ट, पाण्यापासून मूलभूत सोयी-सुविधांचा अभाव दिसतो. ज्येष्ठांच्या फार अपेक्षा नाहीत; पण त्यांना सन्मानाची वागणूक हवी. त्यांच्याप्रति कृतज्ञतेचे भान जपले जावे एवढेच त्यांचे म्हणणे. सध्या महापालिका निवडणुकीची धामधूम आहे. किमान नवे कारभारी तरी ही समस्या समजून घेतील, ही अपेक्षा. मात्र, दुर्दैवाने चुनावी मुद्द्यांभोवतीच निवडणुका गाजत आहेत. सारे जण विकासाच्या नावाने गळे काढत आहेत. शहरांमध्ये येऊ घातलेल्या या अनुभवी 'तरुणांचा' शहरांची जडणघडण अन् विकासासाठी खुबीने वापर व्हावा, इतकीच आजच्या युवादिनी अपेक्षा!

# मतदान करूू चला !

तब्बल आठ वर्षानंतर महानगरपालिकेच्या निवडणूका होत असल्याने यंदा राजकीय पक्षांची नेतेमंडळी, कार्यकर्ते यांसह सामान्य नागरिकांम ध्येहे उत्साहाचे वातावरण दिसून आले. मतदारांना आकृष्ट करण्यासाठी प्रत्येक उमेदवाराने आपल्या मतदार क्षेत्रातील गल्ली-बोळा पिंजून काढला आहे. नानाविध आश्वासने दिली आहेत,आजतागायत झालेल्या प्रचाराच्या व्याप्तीवरून पक्षाच्या प्रमुख मंडळींनी यश-अपयशाची गणिते मांडण्यासही सुरुवात केली आहे.

यंदा पक्ष आणि उमेदवार यांच्याकडून प्रचारासाठी जीवाचे रान केले गेले असले, तरी मतदान करण्यासाठी मतदार किती प्रमाणात घराबाहेर पडतात यावरून पक्षांचे आणि उमेदवारांचे भवितव्य ठरणार आहे. महापालिका क्षेत्रातील समस्त सरकारी यंत्रणानी मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी आटोकाट प्रयत्न केले आहेत. विविध माध्यमांतून जागृतीही केली आहे,. मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे ही शहरे दाट लोकवस्तीची असल्याने या ठिकाणी उभारण्यात येणारी म तदान केंद्रे नागरिकांच्या घरापासून जेमतेम एक किलोमीटरच्या अंतरात असतात. तरीही अनेक नागरिक मतदान करण्यासाठी घराबाहेर पडण्यास, मतदानासाठी रांग लावण्यास इच्छुक नसतात हें आजतागायतचे निरीक्षण आहे. असे असले तरी काही गोष्टींचे कौतुकही वाटते. वयाची नव्वदी-शंभरी गाठलेले जेष्ठ नागरिक मतदानासाठी बाहेर पडतात, अधू, अपंग नागरिक इतरांच्या साहाय्याने उत्साहाने मतदान करताना प्रत्येक वेळेस दिसून येतात, नोकरी व्यवसायानिमित्त देशाबाहेर गेलेले काही नागरिक केवळ मतदान करण्यासाठी हजारो किलोमीटरचा प्रवास करून भारतात येतात. या सर्वांचा उत्साह पाहिल्यावर जे नागरिक मतदान करण्यासाठी घराबाहेर पडत नाहीत, मतदानानिमित्त मिळालेल्या सुट्टीचा उपयोग मौजमजा करण्यासाठी आणि सहलीला जाण्यासाठी करतात त्यांची लोकशाही उपभोगण्याचीच पात्रता नाही असे वाटते. नगरसेवक हा सामान्य नागरिकाचा सर्वात जवळचा लोकप्रतिनिधी असतो. आपल्या प्रभागातील नागरिकांना अनेकदा तो वैयक्तिकरित्या ओळखत असतो. आपल्या परिसरातील लहान सहान समस्या घेऊन त्याच्याकडे जाता येते. त्याचे साहाय्य घेता येते त्यामुळे हा लोकप्रतिनिधी निवडण्यात आपल्या प्रत्येकाचा सहभाग असणे अत्यंत आवश्यक आहे. नगरसेवक निवडताना सध्या वारे कोणत्या पक्षाचे आहेत, महापालिकेवर कोणत्या पक्षाची सत्ता असायला हवी या गोष्टी बाजूला ठेवून आपल्या प्रभागाच्या समस्या सोडवण्यास कोणता उमेदवार सक्षम आहे, स्वहितापेक्षा जनहिताला प्राधान्य देणारा उमेदवार कोणता आहे, नागरिकांच्या अडीअडचणींना उद्या कोण धावून येऊ शकतो या गोष्टी लक्षात घेऊन मतदान करायला हवे. मतदान म्हणजे कोण्या राजकीय नेत्यावर किंवा पक्षावर उपकार करणे नव्हे, तर आपल्या आणि आपल्या कुटुंबियांच्या सुरक्षेसाठी आणि सुविधेसाठी योग्य लोकप्रतिनिधींची निवड करणे ही भावना लोकांम ध्ये केव्हा जागृत होणार ? आपल्या, आपल्या कुटुंबाच्या आणि समाजाच्या भवितव्यासाठी आपले एक मतही बहुमोल कामगिरी करणारे ठरणार आहे त्यामुळे निरुत्साह झटकून मतदान करण्यासाठी घराबाहेर पडूया !

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

## या मतदाना..

अवश्य या मतदानां
आग्रहाचे आमंत्रण
घरच्या कार्यक्रमांस
घरातल्यांस निमंत्रण

आपल्या स्वागताला
आपणबांधले तोरण
कुणाचेहाती सुकाणूं
चला ठरवू या धोरण

आपल्या सु भविष्या
चला करा उध्दारण
अभिमानेकर्तव्यपूर्ती
स्वता बनले उदाहरण

जराशा आळसापोटी
ना निर्भरते चिरहरण
स्तोम नको गुंगत्वाचे
इतर कामाचे विवरण

मतदान पावन दिवस
नको कर्तव्यविस्मरण
शाई हवीचं बोटाला
एक दुजा देई स्मरण

खोटे नाटे उगाकारण
प्रमादा नको आवरण
सोनसंधीलोकशाहीत
गंडस्थळावर नियंत्रण

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# एका मताची गोष्ट...

सकाळीच एका मित्राचा फोन आला आज मतदानाची सुट्टी आहे आम्ही महाबळेश्वरला फिरायला चाललोय येतोस का? मी म्हटलं पण आज तर मतदान आहे रे मतदान केलंस का? तो म्हणाला, 'माझ्या एका मताने कुठे काय फरक पडणार आहे, आणि त्या मतापेक्षा आजचा दिवस कसा चांगला जाईल याचं नियोजन करतोय मी.' मी त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला परंतु तो त्याच्या म तावर ठाम होता. त्याच्याशी संवाद संपल्यावर माझ्या मनात विचारचक्रे सुरु झाली. आणि तेवढ्यात टीव्हवर एका चित्रपटातला एक गाजलेला डायलॉग कानावर पडला एक चुटकी सिंदूर की कीमत तुम क्या जानो रमेश बाबू... हा डायलॉग ऐकायला फिल्मी वाटला तरी त्यात एका छोट्याशा गोष्टीचे अथांग म हत्त्व आज माझ्या लक्षात आले. माझ्या मनात सहज एक विचार आला आजच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर, याच धर्तीवर आपण स्वतःलाही विचारले पाहिजे एक वोट की कीमत तुम क्या जानो मतदार बाबू...? लोकशाहीचा सन्मान आहे हे मत, विकासाचे वरदान आहे हे मत!

प्रत्येक मताची किंमत किती अनमोल आहे हे आपल्या लक्षात येणे गरजेचे आहे. आज सूर्योदयासोबत आपल्या लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव साजरा होत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांतर्गत येणाऱ्या महापालिका निवडणुकांचे मतदान! पण अनेकदा आपण विचार करतो, माझ्या एका मताने काय होणार? किंवा तो निवडून आला काय किंवा हा, मला काय फरक पडतो? जर



तुमच्या मनातही असे विचार येत असतील, तर हा लेख तुमच्यासाठी आहे. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे केवळ राजकीय आखाडा नव्हे, तर तुमच्या घरासमोरील रस्ता, पाण्याचे नळ, कचरा व्यवस्थापन आणि तुम च्या मुलांचे भविष्य ठरवणारी केंद्र आहेत. लोकशाहीचा उत्सव जेव्हा निवडणुकीच्या रूपाने येतो, तेव्हा प्रत्येक नागरिकाला राजा होण्याची संधी मिळते. त्यातही 'स्थानिक स्वराज्य संस्था' म्हणजे लोकशाहीची प्राथमि क शाळा. आपल्या गल्लीचा, गावाचा किंवा शहराचा कारभार कसा असावा, हे ठरवण्याचा अधिकार देणारी ही निवडणूक उद्या पार पडत आहे. अशा वेळी 'माझ्या एका मताने काय होणार?' हा विचार करणे म्हणजे आपल्या भविष्याशी खेळ करण्यासारखे आहे.

भारतीय राज्यघटनेच्या ७३ व्या आणि ७४ व्या दुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांना (ग्राम पंचायत, नगर पालिका, महानगरपालिका) घटनात्मक दर्जा दिला. या संस्थांचे महत्त्व यासाठी आहे कारण त्या आपल्या दैनंदिन जीवनाशी थेट जोडलेल्या आहेत. रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, आरोग्य केंद्रे आणि प्राथमिक शिक्षण या मूलभूत गरजांचे नियोजन याच स्तरावर होते. दिल्ली किंवा मुंबईत बसलेले नेते आपल्या गल्लीतल्या कचऱ्याचा प्रश्न सोडवू शकत नाहीत; त्यासाठी आपल्याला सक्षम स्थानिक प्रतिनिधीचीच गरज असते.

बरेच जण म्हणतात माझ्या एका मताने असा काय फरक पडणार आहे? इतिहास साक्षी आहे की, एका मताने सत्तेचे तख्ते पलटले आहेत आणि एका मताने मोठ्या नेत्यांचे भविष्य बदलले आहे. अटलबिहारी वाजपेयी यांचे केंद्र सरकार लोकसभेत केवळ १ मताने पडले होते. त्या एका मतामुळे देशाला पुन्हा निवडणुकीला सामोरे जावे लागले. २००८ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सी.पी. जोशी यांचा अवघ्या १ मताने पराभव झाला. धक्कादायक बाब म्हणजे त्यांच्या पत्नी आणि ड्रायव्हरने त्या दिवशी मतदान केले नव्हते. जर त्यांनी मतदान केले असते, तर राज्याचा इतिहास वेगळा असता. एका मताची किंमत ही केवळ कागदावरची नोंद नसते, तर ती एका सामान्य नागरिकाचे 'ब्रह्मास्त्र' आणि नेत्यासाठी त्याच्या राजकीय अस्तित्वाची 'कसोटी' असते. ही उदाहरणे केवळ राजकीय नेतृत्वाच्या फायद्या तोट्याची नाहीत तर प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या प्रत्येक नागरिकाच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित आहेत. सामान्य नागरिकासाठी मत हे केवळ कर्तव्य नाही, तर तो एक अधिकार आणि आवाज आहे. जेव्हा आपण एक सजग नागरिक म्हणून मतदान करतो, तेव्हा आपण एकप्रकारे प्रत्यक्षात एका उमेदवारासोबत ५ वर्षांचा सेवा करार करत असतो. आपले एक मत हे ठरवते की पुढची १८२५ दिवस आपल्या आणि आपल्या भागाच्या समस्या कुणी सोडवायच्या.

तसेच जर निवडून आलेला प्रतिनिधी काम करत नसेल, तर त्याला सत्तेवरून खाली खेचण्याची ताकद आपल्या त्या एका मतामध्ये असते. माझ्या एका मताने काय होणार? हा विचार करून जर आपण मतदान टाळले, तर आपण आपल्या हक्काचा त्याग करतो हे आपल्या लक्षात यायला हवे. मतदान हे केवळ आपल्या सामाजिक बाबींशीच नाही तर आर्थिक बाबींवर देखील प्रभाव पाडते. आपण भरलेला टॅक्स (ऋध्दढ, इन्कम टॅक्स इ.) हा पैसा रस्ते, पाणी आणि आरोग्यावर कसा खर्च व्हावा, हे ठरवणारा मॅनेजर निवडण्याची ही संधी असते. त्यामुळे आपले हे एक एक मत एकप्रकारे आपल्या पैशाच्या विनियोगावर नियंत्रण ठेवत असते.

सामाजिक समतेच्या दृष्टीने मतदाराला आणि त्याच्या मताला लाखमोलाची किंमत आहे. मतदानाच्या रांगेत उभा असलेला करोडपती उद्योगपती असो, सेलिब्रिटी असो अथवा हातावर पोट असलेला एखादा गरीब मजूर असो दोघांच्याही मताची किंमत एकसारखीच असते. हीच खरी सामाजिक समानता आहे.

प्रत्येक मतदाराने आपले मत हे 'दान' म्हणून न समजता 'गुंतवणूक' म्हणून पाहावे. जेव्हा आपण मतदान करतो, तेव्हा आपण फक्त एका माणसाला निवडून देत नाही, तर आपल्या भागाच्या विकासाची दिशा ठरवत असतो.

भारतात मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी निवडणूक आयोग प्रयत्नशील आहे. तरीही, ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागात मतदानाची उदासीनता अधिक दिसून येते. अनेकदा सुशिक्षित वर्ग मतदानाच्या दिवशी 'सुट्टी' साजरी करण्यात धन्यता म ानतो. जेव्हा आपण मतदान करत नाही, तेव्हा आपण अप्रत्यक्षपणे चुकीच्या उमेदवाराला निवडून येण्यास मदत करत असतो. जर ६०% मतदान झाले, तर उर्वरित ४०% लोकांनी दिलेला कौल हा संपूर्ण १००% लोकांवर लादला जातो. ही लोकशाहीची शोकांतिका आहे. आणि म्हणून हिच वेळ आहे आपल्या एका मताची खरी ताकद समजून घेऊन त्याचा वापर करण्याची.

आज उत्स्फूर्तपणे आणि निर्भीडपणे मतदान करून आपल्या एका मताची ताकद दाखवून द्या आणि लोकशाहीला बळकट करा!

**- सागर ननावरे, पुणे**
**(राजकीय विश्लेषक व अभ्यासक)**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## तिसरे रानवारा राज्यस्तरीय कवी संमेलन उत्साहात संपन्न



**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि,१५, सोलापूर (मंगळवेढा) :** तालुक्यातील डोंगरगाव येथे सद्गुरु गाडगेबाबा सार्वजनिक वाचनालय आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा मंगळवेढा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तिसरे रानवारा राज्यस्तरीय कवी संमेलन मोठ्या उत्साहात व साहित्यिक वातावरणात पार पडले. या राज्यस्तरीय कवी संमेलनाचे उद्घाटन प्रा. डॉ. लक्ष्मणराव ढोबळे (माजी राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साहित्यिक व कादंबरीकार दशरथ यादव हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून आरती कणीरे (महिला उपपोलीस निरीक्षक, मंगळवेढा), प्रा.डॉ.शिवाजी शिंदे (सहाय्यक कुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर), डॉ. अनिता खेबुडकर, संतोष फटे (कादंबरीकार), ज्येष्ठ गझलकार सिराज शिकलगार, ज्येष्ठ कवी दत्तात्रय जमदाडे, लवकुमार मुळे, ज्येष्ठ साहित्यिक दि. बा. पाटील यांच्यासह मुख्य आयोजक, उत्सवमूर्ती माणदेशी कवी डॉ. लक्ष्मण हेंबाडे उपस्थित होते. उद्घाटन प्रसंगी प्रा.डॉ.लक्ष्मणराव ढोबळे म्हणाले, पांढऱ्या कागदावर काळे करणे एवढी कविता सोपी नसते. कविता म्हणजे मनोबल, धैर्य, साहस, जिद्द व चिकाटी. हिरव्या रानातील पानांप्रमाणे आणि जनसामान्यांच्या कानात रमणारी कविता समाजाला दिशा देते. त्यांनी कवींच्या रचनांचे मनापासून कौतुक करत डॉ.लक्ष्मण हेंबाडे यांच्या साहित्यिक कार्याचा विशेष उल्लेख केला.या संमेलनात राज्यभरातील मान्यवर कवींनी आपल्या विविधांगी रचनांनी रसिकांची मने जिंकली. यामध्ये गौसपाक मुलाणी, अमीर पटेल, संतोष रायबान, विजय खाडे, रामप्रभू माने, अ‍ॅड. पत्रकार कवयित्री जयश्री सोनवणे, गझलकार शहा, वंदना नागणे, देवेंद्र गावंडे, धनंजय माळी, संजय सोनवणे, गिरीधर इंगोले, स्वाती बंगाळे, राणी धनवे, डॉ.अनिल निकम, मोहिदीन मुलाणी, शितल गाजरे, हिना शेख, सुवर्णा तेली, विद्या हेंबाडे आदी कवींनी काव्यवाचन सादर करून संमेलन रंगतदार केले.या कवी संमेलनाचे सूत्रसंचालन महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध निवेदक 'रानकवी' जगदीप वनशिव यांनी आपल्या बहारदार पहाडी आवाजात चारोळ्या व शीघ्र शाहीरी सादर करत केले, ज्यामुळे रसिक मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमाचा समारोप ज्येष्ठ कथाकार शांतिनाथ मांगले यांनी विनोदी कथाकथनातून आपले मनोगत व्यक्त करून केला. मंगळवेढा तालुक्यातील डोंगरगाव येथील हिरकणी पॅलेस येथे पार पडलेले हे तिसरे रानवारा राज्यस्तरीय कवी संमेलन साहित्यप्रेमींना समृद्ध करणारे ठरले.

## आदर्श सरपंच आशाताई कदम यांचा सत्कार



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१४, पाटण (सातारा) :** दिलीप जाधव दिव्यांग मित्र परिवार, पाटण तालुका यांच्यावतीने आशाताई मारुती कदम यांना आदर्श सरपंच पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. धडामवाडी पाटण तालुक्यातील (केरळ) गावातील लोकनियुक्त दिव्यांग सरपंच आशाताई मारुती कदम यांना काही दिवसांपूर्वी आदर्श सरपंच पुरस्कार मिळाल्याबद्दल दिलीप जाधव दिव्यांग मित्र परिवाराच्यावतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात पाटण तालुक्यातील अनेक गावांमधून दिव्यांग लोकांनी सहभाग घेतला. दिलीप जाधव दिव्यांग मित्र परिवाराच्यावतीने सौ. आशाताई मारुती कदम यांना त्यांचे यु डी आयडी कार्ड, डिसॅबिल्टी सर्टिफिकेट, शिवरायांची प्रतिमा, साडी, शाल, पुष्पगुच्छ, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी अशोक काळूगडे, लक्ष्मण कदम, सुरेश कदम, दीपक कदम, रघुनाथ संकपाळ यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन शंकर संकपाळ यांनी केले. राजेंद्र कदम यांनी आभार मानले. कार्यक्रमास दिलीप जाधव, अशोक मोरे, गीता साळुंखे, रंजना शिर्के, संजय शिंदे, सारिका शेटे, शारदा पाटील, गोविंद जाधव, शंकर शिर्के, सुरेश सुतार, पांडुरंग डिगे, रमेश लोहार, प्रमोद देसाई, गणेश जाधव, शंकर संकपाळ, विठ्ठल लोहार, बळीराम पवार, सुरेश जाधव, विजय साठे, आण्णा पवार, रामचंद्र देसाई, विष्णू जाधव, रमेश कुंभार आदींसह पाटण तालुक्यातील दिव्यांग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## चैन चोरीचा आरोपी २४ तासांत अटकेत

### घरफोडी करणाऱ्या सराईत टोळीचा पर्दाफाश; सुमारे २० लाखांचा मुद्देमाल जप्त




**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.१४, शहापूर (ठाणे) :** शहापूर पोलीस ठाण्याने अवघ्या २४ तासांत चैन चोरी प्रकरणातील आरोपीस अटक करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तसेच स्वतंत्र कारवाईत घरफोडी करणाऱ्या सराईत टोळीचा पर्दाफाश करून सुमारे १९,९४,५४०/- रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात यश मिळवले आहे.

दि. ०७/०१/२०२६ रोजी टेंभा, बेलवड येथे ५९ वर्षीय महिलेच्या गळ्यातील १.५ तोळे वजनाची सोन्याची चैन जबरदस्तीने चोरी केल्याप्रकरणी किरण काळूराम भोईर (वय ३४, रा.टेंभा) यास सीसीटीव्ही व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे अटक करण्यात आली.

तसेच दि. २५/१२/२०२५ रोजी झालेल्या घरफोडी प्रकरणात कैलास चिंतामण मोरे (वय ४४) व जयप्रकाश राजाराम यादव (वय ३६) (रा.सोनगिर, जि.धुळे) यांना अटक करून त्यांच्याकडून सोने, चांदी, रोख रक्कम व गुन्ह्यात वापरलेली कार असा एकूण सुमारे २० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींकडून राज्यातील विविध ठिकाणी केलेल्या अनेक घरफोडी व चोरीच्या गुन्ह्यांची कबुली देण्यात आली आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण डॉ.डी.एस.स्वामी, अपर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल व उपविभागीय पोलीस अधिकारी मिलिंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, पो.नि. मुकेश ढगे यांच्या नेतृत्वाखाली शहापूर पोलीस ठाण्याच्या पथकाने केली आहे.

## बुलेट ट्रेन जमीन संपादित मोबदला न मिळाल्याने पालघरमधील शेतकऱ्यांचा संताप



### बुलेट ट्रेनचे काम बंद

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१४, डहाणू (पालघर) :** मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला अद्याप न मिळाल्याने पालघर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा संयम सुटला असून, संतप्त शेतकऱ्यांनी अखेर बुलेट ट्रेनचे काम बंद पाडले आहे.

वाणगाव परिसरातील वनई, साखरे, हनुमाननगर, शिगाव, चंद्रनगर आदी गावांतील बाधित शेतकऱ्यांनी सोमवारी सकाळी एकत्र येत काम स्थळी आंदोलन केले.

बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी पालघर जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणावर शेतजमिनी ताब्यात घेण्यात आल्या आहेत. मात्र, त्यातील अनेक शेतकऱ्यांना अजूनही त्यांच्या जमिनीचा तसेच झाडे व घरे बाधित झाल्याचा मोबदला मिळालेला नाही. काही शेतकऱ्यांना केवळ नोटिसा देण्यात आल्या असून प्रत्यक्ष मोबदला न देता थेट काम सुरू करण्यात आल्याने संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

हनुमाननगर, शिगाव, चंद्रनगर परिसरातील सुमारे २७ शेतकऱ्यांच्या जमिनीवरून रेल्वे मार्ग जात असून, त्यांची शेती, झाडे व घरे मोठ्या प्रमाणावर बाधित झाली आहेत. अंदाजे पाच ते सहा एकर जमीन ताब्यात घेण्यात आली असतानाही अद्याप प्रत्यक्ष मोबदला दिलेला नाही. मोबदला न देता जबरदस्तीने काम सुरू केल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

आम्हाला समाधानकारक मोबदला मिळेपर्यंत आमची जमीन देणार नाही, असा ठाम पवित्रा घेत शेतकऱ्यांनी काम रोखले. यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर शेतकऱ्यांच्या आंदोलनामुळे बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम तात्पुरते बंद करण्यात आले.

दरम्यान, काही शेतकऱ्यांनी असा आरोप केला की, बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांनी मोबदल्याबाबत आश्वासन देऊन झाडे तोडली व घरे पाडली, मात्र प्रत्यक्ष पैसे दिले नाहीत. सातबारा उतारा असूनही आम्हाला आमच्या जमिनीचे पैसे मिळाले नाहीत, अशी व्यथा लक्ष्मण घवाळा, लक्ष्मण अंधेर यांच्यासह अन्य शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

आदिवासी एकता परिषदेचे पदाधिकारी भरत वायडा यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन झाले. मोबदला न दिल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून न घेतल्यास आणि तत्काळ मोबदला अदा न केल्यास बुलेट ट्रेन प्रकल्पाला तीव्र विरोध करण्यात येईल, असा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला.

या घटनेमुळे बुलेट ट्रेन प्रकल्पातील अधिकाऱ्यांची चांगलीच धावपळ उडाली असून, प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांच्या मागण्यांवर तोडगा काढावा, अशी मागणी होत आहे.

## देवगाव शिवारात ५ वर्षांचा बिबट्या जेरबंद; वन विभागाची तत्काळ कारवाई

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१४, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यातील मौजे देवगाव येथील शेतकऱ्यांच्या पिकाला आणि जीवाला धोका निर्माण करणारा बिबट्या अखेर वन विभागाच्या पिंजऱ्यात अडकला आहे. बुधवार, दि. १४ जानेवारी २०२६ मध्यरात्रीच्या सुमारास ही घटना घडली असून, बिबट्या जेरबंद झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, देवगाव येथील शेतकरी किशोर दत्तू बोचरे यांच्या गट नंबर ८०/२ मध्ये बिबट्याचा वावर असल्याचे लक्षात आल्याने वन विभागाने पिंजरा लावला होता. बुधवारी मध्यरात्रीच्या सुमारास सावजाच्या शोधात आलेला एक नर जातीचा बिबट्या या पिंजऱ्यात अडकला.



हा बिबट्या पूर्ण वाढ झालेला असून त्याचे वय अंदाजे ५ ते ६ वर्षे असल्याचे सांगण्यात आले आहे.

बिबट्या पिंजऱ्यात अडकल्याची माहिती मिळताच वन विभागाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. वन कर्मचाऱ्यांनी अत्यंत तत्परतेने बिबट्याला रेस्क्यू केले आणि त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर तातडीने शासकीय वाहनाद्वारे त्याला पुढील वैद्यकीय तपासणी व कार्यवाहीसाठी 'निफाड वन उद्यान' येथे हलविण्यात आले आहे.

सदर माहिती वन कर्मचारी विजय दोंदे यांनी दिली. आणि (वनपरिक्षेत्र अधिकारी येवला प्रादेशिक)- राहुल घुगे, (वनपाल मनमाड)- जयराम शिरसाट, (वनरक्षक)- विजय दोंदे, गोपाळ राठोड, पंकज नागपुरे व आधुनिक बचाव पथक, विजय माळी, सागर दुशिंग, भारत माळी, राहुल ताटे, असिफ पटेल, सुनील भुरुक, वन विभागाने केलेल्या या जलद कारवाईचे ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.

## रांधा सेवा सोसायटी बिनविरोध निवडी !

### चेअरमनपदी संतोष लामखडे तर संभाजी आवारी व्हा चेअरमनपदी बिनविरोध



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील रांधे विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमन, व्हा चेअरमन पदासाठी मंगळवार दि.१३ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता सचिव खनकर भाऊसाहेब यांच्या अध्यक्षतेखाली सभा संपन्न होऊन त्यात संतोष भाऊसाहेब लामखडे यांची चेअरमन तर संभाजी उर्फ किरण भगवान आवारी यांची व्हा चेअरमन म्हणून बिनविरोध निवड झाली.

त्यांना अनुक्रमे माजी चेअरमन उत्तम गायकवाड सर विनोद फापाळे आबाजी आवारी माजी चेअरमन अमोल आवारी सूचक व अनुमोदक राहिले. यावेळी उत्तम गायकवाड, आबाजी आवारी, अरुण आवारी गुरुजी, दिलीप आवारी गुरुजी, संतोष साबळे, विजय सखाराम आवारी, जयश्री आवारी, अमोल आवारी, बाळासाहेब साबळे, विनोद फाफाळे, बाळासाहेब आवारी, चांगदेव थोरात, शांताराम सरोदे, केरुभाऊ म्हस्कुले, अनिल आवारी, संतोष काटे, सुरेश आप्पा आवारी, महेंद्र आवारी, सुरज आवारी, शरद आवारी, आनंद आवारी, राजाराम झिंजाड, भुषण आवारी, सतिश लामखडे, गजनान मोरे, संपत लामखडे, गोकुळ आवारी, अमोल शिंदे, शाकिर तांबोळी, महादेव आवारी, कैलास आवारी, सुरेश थोरात, अथर्व आवारी, सचिव खणकर भाऊसाहेब, अमोल शेंडकर आदी उपस्थित होते.

## मुंडे महाविद्यालयात स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी

**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.१४, रत्नागिरी :** मंडणगड तालुक्यातील सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात नुकतीच सांस्कृतिक विभाग, आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, स्वामी विवेकानंद सामाजिक न्याय विभाग व एन.एस.एस. विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात आली. मार्गदर्शक म्हणून माजलगाव येथील सिद्धेश्वर महाविद्यालयाचे डॉ. कमलकिशोर लड्डा हे ऑनलाईन उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. वाल्मिक परहर होते. यावेळी उपप्राचार्य डॉ.विष्णू जायभाये, प्रा.हनुमंत सुतार, डॉ.संगीता घाडगे, प्रा.संदीप निर्वाण, डॉ.महेश कुलकर्णी, प्रा.तमन्ना मोरे, प्रा.प्राची कदम, आदी मान्यवर उपस्थित होते. सुरुवातीला स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस प्रभारी प्राचार्य डॉ. वाल्मिक परहर व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस विद्यार्थिनी कु. शामली बुटाला हिच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. तत्पूर्वी डॉ. महेश कुलकर्णी यांनी प्रास्ताविक करुन कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट करताना जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या कार्याविषयी थोडक्यात माहिती दिली.

## जिओच्या टॉवर चा खेळ खंडोबा !




**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.१५, उदगीर (लातूर) :** उदगीर तालुक्यातील गुडसुर परिसरात गेल्या काही दिवसांपासून मोबाईल नेटवर्क सेवा विस्कळीत झाली असून मोठ मोठ्या रकमेचे रिचार्ज करून मोबाईल नेटवर्क मिळत नसल्याने ग्राहकांना मनस्ताप करावा लागत आहे. नेटवर्क संदर्भात त्वरित दुरुस्ती नाही केल्यात गुडसुरचे उपसरपंच बालाजी देमगुंडे यानी हे टॉवर जमीनदोस्त करण्याचा इशारा दिला आहे. गुडसुर गावात ४ कंपन्यांचे टॉवर असून ते टॉवर शोभेची वस्तू बनले आहेत. बीएसएनएल, आयडिया, एअरटेल, जिओ, कंपन्यांची ग्राहक संख्या गुडसुर हिप्परगा डाउळ या परिसरातील मोठी ग्रहांची संख्या फार आहे. सध्या मोबाइल स्क्रीनवर रेंज दिसते. परंतु कॉल लागत नाही.

दहा वेळेस प्रयत्न करून फोन लागणे, फोन लागल्यावर विचित्र आवाज येणे, कोल मध्येच कट होणे अशा अनेक तक्रारी या नेटवर्कसंदर्भात ग्रामस्थांना सतावत आहे. गेल्या तीन-चार दिवसात असलेल्या प्रकारामुळे रेशन दुकानदारांनाही बायोमेट्रिक चालवण्यासाठी मोठी कसरत करावी लागत असल्याने ग्राहकांना दुकानासमोर ताटकळत बसावे लागत आहे एक तर या कंपन्यांचे कुठलेच संपर्क कार्यालय स्थानिक तालुकास्तरावर नसल्याने संपर्क करावा तरी कोणाशी असा प्रश्न ग्राहकांना पड़त आहे. या भागातील काहि मुले ऑनलाइ सी डॉक सारखे कोर्स करत आहे त्यांना पण यांचा फार मोठा फटका बसत आहे. महत्वाच्या कामानिमित्त फोनच लागत नाही. ग्राहंकाचे हजारो

रुपयाचे केलेले रिचार्ज वाया जात आहे संबंधित कंपन्यांनी आपल्या नेटवर्कची गुणवत्ता सुधारणे गरजेचे आहे ग्रामीण भागातील कमकुवत नेटवर्क मुळे बैंकिंग सेवा, सेतु सुविधा केंद्राचे ऑनलाइनच्या माध्यमातून कैशलेश व्यवहार करणारे मोठे व्यापारी व ऑनलाइन अभ्यास करणारे विद्यार्थ्यांना त्रास होत आहे.

हातात अँड्रॉइड मोबाईल आहे. सोशल मीडियाचा तुफान वापरामुळे तरुणाईस आकर्षित करण्यासाठी विविध योजनेच्या माध्यमातून नेट, कॉलिम मोफत असाल्याचे आमिष विविध कंपन्यांकडून देण्यात येते याचाच एक भान पोर्ट जाऊट करून कंपनी बदलून घेण्याची स्पर्धा कमी आहे. नेटवर्कच्या बाबतीत ग्राहक फाउंडेशन समिती महाराष्ट्र राज्य लातूर जिल्हा अध्यक्ष जयराम देमगुंडे यांनी वरिष्ठांकडे तक्रार करणार असल्याचे सांगितले गुडसुरचे उपसरपंच बालाजी देमगुंडे व सरपंच उत्तम सूर्यवंशी, माधव टेपाले पत्रकार नागेश नवांडे शिवानंद तोटकर अविनाश मरलापले लक्ष्मण सूर्यवंशी आलम पठाण पप्पू माळी यांनी टॉवर जमीनदोस्त करणयाची व पाडण्याचा इशारा विविध कंपन्यांना दिला आहे.

# ढोकेश्वर विद्यालयाचा राज्य चित्रकला परीक्षेत १०० टक्के निकाल

## इंटरमिजिएट ३४ व एलिमेंटरी ६२ सर्व विद्यार्थी उत्तीर्ण



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, पारनेर (अहिल्यानगर) :** महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाच्या वतीने नुकतीच राज्यस्तरीय एलीमेंट्री व इंटरमिजीएट चित्रकला परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, टाकळी ढोकेश्वर येथिल श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले.

शाळेचा या परीक्षेत १०० टक्के निकाल लागला आहे. एलिमेंट्री चित्रकला परीक्षेला एकूण ६२ विद्यार्थी तर इंटरमिजिएट चित्रकला परीक्षेला ३४ विद्यार्थी बसले होते. विशेष म्हणजे दोन्ही परीक्षांतील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, विद्यालयाने आपल्या उत्कृष्ट शैक्षणिक परंपरा कायम राखली आहे.

इंटरमिजिएट चित्रकला परीक्षेत अफनअली शेख, अलीना शेख, वेदिका थोपटे, तन्वी मांडगे, श्रेयशी झावरे यांनी अ श्रेणी तर वैभवी कटारीया, श्रद्धा दातीर, आराध्या कडुसकर यांना एलिमेंटरी परीक्षेत अ श्रेणी मिळाली आहे. ब श्रेणीमध्ये ३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना कलाशिक्षक चित्रकार नारायण शेळके यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले, या यशाबद्दल जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, जेष्ठ विश्वस्त सीताराम खिलारी गव्हर्निंग कौन्सिल सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी, प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक मनीषा गाडगे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लहू जाधव तसेच टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचा विद्यालयात सन्मान करण्यात आला. यावेळी शिक्षक मल्हारी वाघसकर,नीलम खिलारी, वैशाली गायखे, निलेश जासूद, पवन कुटे, होरणे भाऊसाहेब, अनुष्का कांबळे,सोनल रोहोकले, प्रिया ढवणे, बाबासाहेब जाधव, रविंद्र मते, अतुल सैद, सुशांत खेडकर, अनिकेत बांगर, विष्णु भद्रे, श्रीरंग धामणे, संजय म्हांडुळे, सुरेखा ठाणगे, अनिता म्हस्के, सोनाली माळवदे, वैशाली ढोकळे, वर्षा भोंडवे, नारायण हरेल, अमोल गोरे आदी उपस्थित होते.

# जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या १२ व्या वर्धापनदिनानिमित्त विशेष पुरस्कार प्रदान सोहळ्याचे आयोजन

**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.१४, पुणे :** शिक्षण हे परिवर्तनाचे महत्त्वाचे साधन आहे. गरीब लोकच राष्ट्राचे नेतृत्व करू शकतात. डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम यांनी वृत्तपत्र वाटून, तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चहा विकून देशाचे नेतृत्व केले. गरीब लोक संघर्षातून पुढे गेलेले असतात, असे मत प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांनी व्यक्त केले.



जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या १२ व्या वर्धापनदिनानिमित्त विशेष पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन डॉ.सुधाकरराव जाधवर शैक्षणिक संकुल, नऱ्हे येथे करण्यात आले होते. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा या सोहळ्यात सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नॅकचे माजी अध्यक्ष डॉ.भूषण पटवर्धन होते. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ विचारवंत डॉ.संजय उपाध्ये उपस्थित होते. तसेच इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दूल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर यांची प्रमुख उपस्थिती होती. ॲड. शार्दूल जाधवर लिखित 'यशाचे शिल्पकार' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमात प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांना शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल, 'डॉक्टर फॉर बेगर्स' म्हणून ओळख असलेले डॉ.अभिजीत सोनवणे यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी, महेश सहकारी बँकेचे अध्यक्ष जुगल किशोर पुंगलिया यांना सहकार क्षेत्रातील योगदानासाठी, तसेच प्रवीण मसालेवालेचे अध्यक्ष राजकुमार चोरडिया यांना उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

डॉ.भूषण पटवर्धन म्हणाले, प्राचार्य डॉ.सुधाकरराव जाधवर यांच्यासोबतच्या संवादातून त्यांनी आपला जीवनप्रवास, संघर्ष आणि आजपर्यंत केलेले कार्य थोडक्यात मांडले. जाधवर ग्रुपने या भागात एक नामवंत विद्यापीठ उभारावे, हे ॲड.शार्दूल जाधवर यांचे स्वप्न आहे. पुणे आणि नऱ्हे यांमधील सीमारेषा आता पुसट झाल्या असून जग एक छोटे खेडे बनले आहे. जिथे हा प्रकल्प साकारेल, तिथे निश्चितच उत्तुंग यश मिळेल. त्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याची मी खात्री देतो.

# झेडपी पंचायत समिती निवडणुकीमध्ये आचार संहितेचे पालन करावे - प्रांत अधिकाऱ्यांचे आवाहन

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.१४, पेण (रायगड) :** महाराष्ट्रात जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीची घोषणा राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केली असून या अनुषंगाने आज पेण प्रांत अधिकारी प्रवीण पवार, तहसीलदार तानाजी शेजाळ, नायब तहसीलदार तुषार कामत, प्रसाद कालेकर, नितीन परदेशी यांनी पत्रकार परिषदेत पेण तालुक्यातील ०५ जिल्हा परिषद गट जागा १० पंचायत समिती गण जागा व निवडणूक कॅम्पेनची माहिती देताना १ जुलै २०२५ च्या राज्य निवडणूक आयोग मतदार यादीनुसार एकुण १ लाख ३९ हजार ४७९ मतदार तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या पाच तर पंचायत समिती १० जागांसाठी ५ फेब्रुवारीला मतदान करणार असून ७ फेब्रुवारीला मतमोजणीतून निकाल जाहीर होणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची घोषणा होऊन राज्याभरात निवडणूक आयोगाची आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

निवडणूक उमेदवारी अर्ज १६ जानेवारी ते २०जानेवारी या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत पेण प्रांत कार्यालयात ऑफलाईन नामनिर्देशन पत्र सादर करता येतील. तर २७ जानेवारी पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेणे, चिन्हवाटप करण्यात येणार आहे.

यासाठी निवडणूक प्रक्रियेचे सर्व सोपस्कार एक खिडकी योजना अंतर्गत प्रांत कार्यालय दालनात व्यवस्था केली आहे. तसेच सभागृहात मदत कक्ष, याचीही व्यवस्था करण्यात आली आहे.




निवडणूकीसाठी १ लाख ३९ हजार ४७९एकुण मतदारांमध्ये महिला मतदार ६९८९८तर पुरुष मतदार ६९५८१ आहेत. ५ विभाग व १० निर्वाचन गणात १९० मतदान केंद्रावर मतदान व्यवस्था करण्यात आली आहे. जिल्हा परिषद उमेदवारांसाठी सहा लाख खर्चाची मर्यादा तर पंचायत निर्वाचन गणात साडेचार लाख खर्चाची मर्यादा देण्यात आली आहे. २१ दिवसांच्या या निवडणुक कॅम्पेनमधे. सर्वांनी आदर्श आचारसंहिता पालन करुन ग्रामीण मंत्रालय ठरलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था लोकशाही निवडणूक उत्सव उत्साहात व शांततेने पार पाडण्यासाठी सहकार्य करावे असे निवडणूक प्रमुख प्रांत अधिकारी प्रवीण पवार यांनी शेवटी सांगितले.

# रयत इंग्लिश मीडियम स्कूल, शिरवळ येथे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१४, खंडाळा (सातारा) :** रयत शिक्षण संस्थेच्या रयत इंग्लिश मीडियम स्कूल, शिरवळ येथे शैक्षणिक वर्ष २०२५–२६ चे वार्षिक स्नेहसंमेलन सोमवार, दि.१२ जानेवारी २०२६ रोजी अत्यंत उत्साही वातावरणात पार पडले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा. उदय दादा कबुले (माजी अध्यक्ष, जिल्हा परिषद, सातारा) हे उपस्थित होते. कार्यक्रमास नवनाथ जगदाळे (विभागीय अधिकारी, मध्य विभाग, रयत शिक्षण संस्था, सातारा), सुरेशकुमार गोडसे (माजी सहाय्यक विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था, सातारा), राजेंद्र तांबे (माजी सभापती, पंचायत समिती, खंडाळा), रवीराज दुधगावकर (सरपंच, शिरवळ), अमोल कबुले (उपसरपंच, शिरवळ), सुनील कुलकर्णी (प्रमुख, कमला मेहता चॅरिटेबल ट्रस्ट, शिरवळ), रमेश चुंद्रू (व्यवस्थापक, आयडीबीआय बँक, शिरवळ) शिवाजी कुपटे (प्लांट मॅनेजर, टी.ई. कनेक्टिव्हिटी, शिरवळ) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच शिरवळ ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य, एस.एम.सी. व पी.टी.ए.चे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. आप्पासाहेब देशमुख (जनरल बॉडी मेंबर, रयत शिक्षण संस्था, सातारा) हे होते. कार्यक्रमाचे निमंत्रक म्हणून डॉ. मोहन राजमाने (प्राचार्य, श्रीपतराव कदम कॉलेज, शिरवळ),



विकास गायकवाड (प्राचार्य, आदर्श विद्यालय, शिरवळ), शाळेच्या मुख्याध्यापिका वर्षा एस. मांढरे, तसेच वसंती एस. घाडगे पर्यवेक्षिका यांनी विशेष योगदान दिले.

कार्यक्रमाची सुरुवात स्वागतगीताने व सरस्वती पूजनाने झाली. नंतर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार घेण्यात तसेच शाळेमध्ये घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धांचे देखील बक्षीस वितरण करण्यात आले. मुलांबरोबर पालक माता व पालक वडील यांच्याबरोबर ज्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या त्याचे देखील बक्षीस वितरण करण्यात आले. नंतर विद्यार्थ्यांनी नृत्य, नाट्य व विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

या कार्यक्रमात इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी छावा या नाटकाचे अतिशय उत्तम सादरीकरण प्रेक्षकांकडून या नाटकांसाठी स्तुतीवर्षाव झाला.यावेळी शाळेतील शिक्षकांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. सदर सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पार पडला. शिक्षकांच्या अथक परिश्रमाबद्दल त्यांचे मनःपूर्वक कौतुक करण्यात आले.

रयत शिक्षण संस्था नेहमीच आदर्श विद्यार्थी घडवत असते. तीच परंपरा जपणारी रयत इंग्लिश मीडियम स्कूल शिरवळ ही शाळा सुद्धा नेहमीच विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार करीत असते तसेच मुलांचा सर्वांगीण विकास व्हावा.

यासाठी सुद्धा सदैव प्रयत्नशील असते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाचा समारोप आनंदी व प्रेरणादायी वातावरणात झाला.

# थोडक्यात

## पामा ग्लोबल इंटरनॅशनल स्पर्धेत भारताचं नाव उंचावणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान




**अक्षराज : मंगेश औटी**

**दि.१४, नवी मुंबई :** पामा ग्लोबल द्वारे आयोजित २३व्या पामा ग्लोबल इंटरनॅशनल स्पर्धेत भारताच्या विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी केली. ही स्पर्धा मलेशियामध्ये नुकतीच पार पडली आणि २८ देशांतील ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी त्यात सहभाग घेतला. अभिमानाची बाब म्हणजे भारता मधून ४४ विद्यार्थ्यां ची निवड या स्पर्धेसाठी करण्यात आली होती. पामा इंडिया या संस्थेने भारतातून विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी निवडले होते आणि त्या यादीत नवी मुंबई APPL ABACUS (जुईनगर, सानपाडा, नेरूळ) 'चे ८ विद्यार्थी सहभागी झाले होते. या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत भारताला अभिमानास्पद स्थान मिळवून दिले. सर्व विद्यार्थ्यांच्या मेहनतीला फळ आलं आणि त्यात विशेष उल्लेखनीय कामगिरी केली ती विद्यार्थी सूर्यांश रासकर याने, त्याच्या कर्तृत्वामुळे त्याला चॅम्पियन क्रमांक भेटला. त्याचप्रमाणे स्वरा नंदकुमार कदम प्रथम क्रमांक, सार्थक नवनाथ लोहार, दक्ष विनोद तेरसे, विपुल मनोज यादव, दुसरा क्रमांक, दक्ष विनोद बारसकर, मानसी महेश पोपाले, रिधी शेट, तृतीय क्रमांक मिळवून यांनी भारताचे आणि जुईनगर , सानपाडा, नेरूळ शहराचे नाव उज्जवल केले. ही स्पर्धा विद्यार्थ्यांना त्यांच्या बुद्धीमत्तेचा आणि चातुर्याचा योग्य ठिकाणी उपयोग करण्याची संधी देते. या विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षक सौ रोहिणी माळी यांच्या कडून विद्यार्थ्यांना मिळालेल्या प्रशिक्षणामुळे त्यांचा आत्मविश्वास आणि कार्यक्षमता वाढली. सर्व विद्यार्थ्यांना, त्यांच्या शिक्षकांना आणि कुटुंबीयांना हार्दिक शुभेच्छा.

## फळबाग, शेतीचे अनुदान व मक्का मंजुरीसाठी काँग्रेसचा इशारा; खासदारांना निवेदन

**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.१४, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** राष्ट्रीय काँग्रेस पार्टीचे सोयगाव तालुकाध्यक्ष राजेंद्र काळे यांनी जालना लोकसभा मतदारसंघाचे खासदार कल्याणराव काळे यांना शेतकरी प्रश्नांबाबत सविस्तर निवेदन दिले आहे. सोयगाव तालुक्यातील शेतकरी बांधवांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे या निवेदनातून लक्ष वेधण्यात आले आहे. तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी सन २०२४ चे अनुदान अद्यापी मिळाले नाही व सोयगाव शहरातील व तालुक्यात फळबाग लागवड केलेली असून अद्याप त्यांना शासनाकडील फळबाग अनुदान मिळालेले नाही. हे अनुदान तातडीने वितरित करण्यात यावे,अन्यथा राष्ट्रीय काँग्रेस पार्टीच्या वतीने जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. तसेच महाराष्ट्र सरकारने खरेदी-विक्री संघाला, सोयगाव यांच्यामार्फत शेतकऱ्यांना चालू हंगामात केवळ २९५ क्विंटलचीच मंजुरी मिळालेली आहे. ही मंजुरी अपुरी असून ती तातडीने वाढवावी, अशी मागणी देखील निवेदनात करण्यात आली आहे. याशिवाय सोयगाव तालुक्यात यावर्षी मक्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झालेले आहे. मात्र मक्का खरेदीसाठी अपेक्षित मंजुरी मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत. त्यामुळे मक्का खरेदीची मंजुरी तातडीने वाढवावी, अशी ठाम मागणी जालना लोकसभेचे खासदार कल्याणराव काळे यांच्याकडे करण्यात आली. शेतकरी हिताचे प्रश्न तातडीने मार्गी न लागल्यास राष्ट्रीय काँग्रेस पार्टीच्या वतीने आगामी काळात तीव्र जनआंदोलन करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा तालुकाध्यक्ष राजेंद्र काळे यांनी दिला आहे. या निवेदनामुळे सोयगाव तालुक्यातील शेतकरी प्रश्नांवर पुन्हा एकदा राजकीय हालचालींना वेग आला असून शेतकरी वर्गाकडून सकारात्मक निर्णयाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## मंडणगड पोस्ट ऑफिस तर्फे पत्रलेखन स्पर्धा उत्साहात संपन्न



**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.१४, दापोली (रत्नागिरी) :** मंडणगड तालुका विकास मंडळ संचलित, डॉ.बी.ए.हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मंडणगड येथे भारतीय टपाल (पोस्ट ऑफिस) मंडणगड विभागामार्फत पत्रलेखन स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेमध्ये इयत्ता पाचवी ते बारावी पर्यंतच्या एकूण ५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. भारतीय टपाल मंडणगड अधिकारी श्री.भोंगाणे व इंगोळे यांचे प्रशाळेचे आदरणीय उपमुख्याध्यापक अर्जुन हुल्लोळी यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या स्पर्धेमध्ये इयत्ता आठवी अ ची विद्यार्थिनी कुमारी विधि आंबेकर हिने मंडणगड पोस्ट ऑफिस मार्फत राबवल्या जाणाऱ्या पत्रलेखन स्पर्धेचे महत्त्व सांगितले. या स्पर्धेचे प्रमुख मंडणगड पोस्ट ऑफिसचे अधिकारी श्री.बोंगाणे यांनी पत्र लेखनाचे महत्त्व आज काळाची गरज का आहे.

याविषयी सखोल माहिती सांगितली. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्याने उत्स्फूर्त सहभाग घेऊन प्रत्यक्ष पत्र लिहून शाळेमध्ये असणाऱ्या टपाल पेटीमध्ये स्वतः टाकले व त्याचा अनुभव घेतला. कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे उपमुख्याध्यापक आदरणीय अर्जुन हुळ्ळोली यांनी पत्र लेखन आज आपण विसरत चाललो आहात त्याचे पुनर्जीवन व्हावे व पत्राचे महत्व तळागाळामध्ये विद्यार्थ्यांना, लोकांना समजावे म्हणून ही स्पर्धा मंडणगड पोस्ट ऑफिस व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल मार्फत राबवण्यात आली. त्याबद्दल मंडणगड पोस्ट ऑफिसचे विशेष आभार मानण्यात आले. या कार्यक्रमाला प्रशाळेचे पर्यवेक्षक आदरणीय शांताराम बैकर, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शेवटी शाळेचे सहा.शिक्षक श्री.हेलोंडे यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.